# खेळासाठी जागेची
# योजना

अरुणा ठक्कर



# आभार

हे पुस्तक उन्नत नगर प्राथमिक शाळेतील मुलांना आणि ज्यांनी शाळेचे वातावरण बदलले अशा संबंधीतांना त्याचप्रमाणे शिक्षकांच्यामधील निर्मिती क्षमता आणि कळकळ या विषयांचा माझा विश्वास ज्या प्रौढ व्यक्तीनी वारंवार व्यक्त करून माझ्या बरोबर काम केले अशा सर्वांना अर्पण केले आहे.

महानगर पालिकेतील सर्वोच्च अधिकारी नगरपालिकेचे आयुक्त श्री. तिनईकर आणि शिक्षणाधिकारी श्री. डी. यू. दंडवते यांना ठामपणे असे वाटते की नगरपालिकेच्या प्राथमिक शाळामध्ये उच्च प्रतीच्या शैक्षणिक सुविधा पाहिजेत. श्री. तेंडूलकर, विमल व्यास आणि हमीदा दार या उप-शिक्षणाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाची कक्षा वाढविण्याला तसेच मुलांना खेळायच्या जागा उपलब्ध करून देण्याला साथ दिली. मुंबई महानगरपालिकेच्या प्रशिक्षण कार्य शाळेय सहभागी असलेल्या ४५ जणांनी, व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी, शिक्षकांनी, समाज सेवकांनी या सर्वानीच हा कार्यक्रम जास्तीत जास्त शाळांमध्ये राबविण्याचे आव्हान स्विकारले आहे.

अशा तऱ्हेचा कार्यक्रम करण्याची माझी कल्पना भारतातील युनिसेफच्या पश्चिम विभागामुळे प्रारंभी रुजली. आमच्या विभागीय प्रतिनिधिंच्यामध्ये असलेली स्पष्टता, दूरदर्शीपणामुळे त्यांनी असे मान्य केले की अशा तऱ्हेच्या प्रयत्नामुळे मुलांसाठी नुसतेच खेळांचे आकृती बंध तयार होणार नसून विधायक आणि प्रतिक्रियात्मक असा परिसर (परिस्थिती निर्माण होणार आहे.)

शिक्षणाशी संबंधित असलेल्यांना हे माहितच आहे की सामाजिक आणि भौतिक परिस्थितींचा मेळ शिक्षणाच्या प्रक्रियेत घातला गेला पाहिजे.

मुंबई महानगर पालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी मला पूर्ण सहकार्य दिले त्याबद्दल त्यांची त्याचप्रमाणे युनिसेफच्या पश्चिम विभाग अधिकाऱ्यांची आणि सतत प्रोत्साहन देणाऱ्या आय्. पी. ए. चे. अध्यक्ष मि. निक निल्सन माझे सहकारी, आणि आय्. पी. ए. कौन्सिलमधील माझे मित्र व तेथील इतर सभासद या सर्वांची मी ऋणी आहे. उन्नतनगरच्या सर्व मुलांना ज्याच प्रेम वाटले असे माझे मित्र मि. जिमी जॉली यांच्याबद्दल माझ्या मनांत विशेष कृतज्ञतेची भावना आहे. या आय्. पी. ए. च्या यू. एस्. ए. च्या टेक्सास मधील सभासदाने शिक्षकांना — तुम्ही थोडीशी पाठ वाकवून काम करायच ठरवल तर न करता येण्यासारख्या फारच कमी गोष्टी राहतील. आपण मुलांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्यास शिकलो तर ती जाणून घेण्याची मुलांची क्षमता निश्चित चांगल्या प्रतीची असते. हा बहुमोल संदेश दिला.

शाळेला भेट देणाऱ्या, थोडा वेळ तेथे कामकरणाऱ्या आमचे निरिक्षण करणाऱ्या अशा व्यक्तींना आमच्याबद्दल आस्था तर होतीच शिवाय त्यांच्या सद्इच्छाही होत्या. रॅचेल, हेजलटाईन जोसी,जांनी मुलांबरोबर 'ब्रिटिश बुलडॉग' 'स्टिक इन् द मड' इत्यादि ब्रिटिश खेळ खेळले. त्यांना भाषा हा अडसर नव्हता.

टाटा समाजशास्त्र संस्थेतील कांहीं गटांनी भेट घेऊन मुलांबरोबर साधने गोळा करून थोडा वेळ काम केले. खेळ तयार केले आणि शिक्षकांशी संवाद साधला. त्या नंतर ''एक्स्ट्रा म्युरल स्टडीज'' विभागाने समाज सेवकांच्या अभ्यासक्रमात 'खेळांच्या जागांची निर्मिती' या विषयाचा समावेश केला. मुलांच्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या २४ व्यक्तींनीही अशा तऱ्हेच्या खेळांची योजना निर्माण करण्याचे विचारात घेतले आहे.

माझ्या प्रकल्पावर पर्यवेक्षकाचे काम करून मला वेळोवेळी न चुकता मदत करणाऱ्या श्री. गायकवाड, नयना मोगरे, आणि जयश्री श्रेयन यांची मी आभारी आहे.

ह्या पुस्तिकेचे आत्मियतेने अनुवाद करणारे श्री. विनायक देशपांडे व सौ. उषा दातार यांचीही मी आभारी आहे.

उन्नतनगरच्या शाळांच्या मुख्याध्यापकांनी सतत साथ दिल्याबद्दल मी त्यांची मनापासून ऋणी आहे. त्यांच्यामध्ये मनात कल्पना तरळत होत्या. आम्ही त्याना साकार करण्यासाठी हात पुढे केले. मी माझ्या मुलांचे आणि शिक्षकांचे आभार मानणे प्रस्तुत नाही. कारण हे त्यांचेच 'काम' आणि 'खेळ' आहे. त्यांना खेळामधून निर्मिती कशी होते हे पूर्णपणे माहीत तर आहेच आणि याबाबतीत ते नवीन मार्गही शोधून काढतील.

अरुणा ठक्कर



# वातावरणातील बदल

शहरी गर्दी, असुरक्षित रस्ते आणि जोरदार वाहतूक यामुळे हालचालींवर निर्बंध पडतात. जागेसाठी, पाण्याच्या उपलब्धतेसाठी आणि नैसर्गिक वन सम्पत्तीसाठी खूप ताण पडतो. राखीव जमीनीची उपलब्धता कमी झाली आहे. आकाशाला भिडलेल्या किंमती, घरांची गच्चडी, झोपडपट्ट्यांची बेसूमार वाढ, चाळींची वाढ यामुळे आरोग्य व पाण्याचे प्रश्न उभे. राहिलेत.

आपण असे म्हणू शकतो की मुलांना बाहेरील मोकळ्या जागेच्या मर्यादित उपलब्धतेमुळे ती घरात किंवा शाळेतच अडकून पडतात. कांहीं वेळेस बहुतांशी मुले रस्त्यावर राहतात व खेळतात.

आपल्या भारतीय कुटुंब व्यवस्थेमध्ये एकत्र कुटुंबे ही विभक्त कुटुंबांपेक्षा जास्त प्रमाणात आढळून येतात त्यामुळे मुलांचे संगोपन करण्यासाठी कुटुंबात प्रौढ व्यक्तींची संख्या जास्त असते. बदलत्या कामाच्या पद्धती आणि जागेची कमतरता ह्यामुळे कुटुंबातील व्यक्तींची कमतरता भासू लागली आहे. आणि ज्या व्यक्ती आहेत त्या कमात जास्तीत जास्त व्यग्र होत आहेत. स्त्रियांचे घराबाहेर पडून नोकरी करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे.

कामकरण्याची जागा आणि राहण्याची जागा वेगवेगळ्या ठिकाणी असल्यामुळे मुलांची प्रौढांच्या सहवासात राहून शिकण्याची संधी नष्ट झाली आहे.

वरील परिस्थिती निर्माण झाल्याने मुलांना अन्न आणि निवारा या खेरीज अन्य गोष्टी देण्यासंबंधी कांही प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या प्रश्नांमध्ये मुलांच्या वाढीला निर्भय आणि सुरक्षीत वातावरण देणे, तो ज्या वस्तीत राहतो त्या वस्तीचा एक घटक म्हणून समर्थपणे काम करण्यास सामाजिक जीवनाला पोषक अशी वर्तणूक आणि समज निर्माण होण्याचे शिक्षण देणे या दोन गोष्टी आहेत. सर्वात प्रारंभीचे व परिणामकारक वातावरण म्हणजे घरातील वातावरण.

जर मुले आपल्या आसपासच्या परिसरातील वातावरणातून माहिती मिळवतात तर घर आणि आसपासचा परिसर मुलांना काय बरे सुचीत करतो?

जेव्हा मुलांना खेळण्यासाठी थोडी फार जागा उपलब्ध असते तेंव्हा ती बहुधा घराच्या पायऱ्या, व्हरांडा किंवा घराजवळील एखादी जागा हीच असते. मुलांचे खेळाचे क्षेत्र या मर्यादेपर्यंतच आपल्याला दिसून येते. सात ते बारा वयोगटातील मुले साधारणतः त्यांच्या घराजवळील रस्ते, फुटपाथ त्याचप्रमाणे घरा घरांमधील मोकळी जागा या मध्येच हिंडत असतात. याच मुलांच्या अनुभव व शिक्षण मिळवण्याच्या जागा असतात.

'समाजाने असा कटाक्ष ठेवला पाहिजे की मुलांपर्यंत आपण जे पोचवतो, त्यामुळे मुलांचे जीवन समृद्ध व्हावे'.

'त्याला विविध अनुभव, निवडीला भरपूर वाव, प्रोत्साहन आणि आव्हान मिळावे.

वर सांगितल्याप्रमाणे मुलांना संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता, घरातील लोकांची व आसपासची जर कमी दर्जाची असेल तर तेवढी जास्त जबाबदारी शाळेवर व समाजावर पडते. शाळेने आणि समाजाने अशा तऱ्हेच्या खेळांच्या जागा निर्माण केल्या पाहिजेत की, ज्यामुळे मुलांना शैक्षणिक वातावरण मिळेल, त्यांना कृती सुचविल्या जातील, तर कांही कृतींना उत्तेजन मिळून मुलांच्या प्रगतीला आवश्यक ठरतील. बहुधा सर्वच शैक्षणिक कार्यक्रमांचा उद्देश मुलांचा शारीरिक आणि वैचारिक विकास हा असतो. त्या बरोबरच सामाजिक शिक्षण, विधायकता, कृतीपूर्ण वागणे, यांचीही वाढ होण्यासाठी मदत होते. मुलांना प्रयोग आणि साहस करण्यास पोषक असे वातावरण उपलब्ध करून दिल्याने त्यांच्यामध्ये प्रौढ जीवनाचे अंतरंग समजण्याची चांगलीच कुवत येईल.

शैक्षणिक वातावरणाचा विकास, सुविधांच्या दर्जावर अवलंबून असतो. या सुविधा, कृतींना प्रोत्साहन देऊन बदल करण्यास सोपे असे मार्ग सुचविणाऱ्या, विधायक सामाजिक वातावरणाची निर्मिती करणाऱ्या तसेच नवेपणा आणि विकास यांना वाव देणाऱ्या असाव्यात.

सुविधांचा दर्जा हा प्रत्यक्ष खेळाच्या जागेवरील वातावरण आणि बाहेरील वातावरण, शाळा आणि गणित, जीवशास्त्र, विज्ञान, कला, व्यायाम, नाट्य या अभ्यासक्रमाचा बाह्य जगाशी संबंध जोडणारा असावा. असा संबंध जोडला गेला तर त्यामुळे असलेल्या गोष्टींमध्ये भर कशी पडेल आणि नवीन गोष्टी कशा निर्माण होतील, त्याचप्रमाणे शिक्षणाचा उपयोग न होणे किंवा ते ठप्प होणे या बाबींसंबंधी कांहीं कळू शकेल. सुविधांच्या दर्जाच्या आशेवरच नागरी आणि ग्रामीण भागांचे पुनरूज्जीवन आणि समाज शिक्षण देणारी साधने अवलंबून आहेत.

# खेळांच्या जागांची व्याख्या

एरिक्सनन (१९६५) खेळाच्या जागेची व्याख्या अशी केली आहे की, 'मुलांचे शिक्षण आणि विकास (सामाजिक, भावनिक, वैचारिक, शारिरिक) होण्यास त्याला पोषक अशा वातावरणाची आणि कृतींची आवश्यकता असते हे लक्षात घेऊन त्यानुसार तयार केलेले घरा बाहेरील शैक्षणिक वातावरण.

निसर्गातील झाडे, झुडपे, टेकड्या, पाणी आणि प्राणी जीवन या गोष्टी विशेषतः खूप लोकवस्ती वाढलेल्या नागरी जीवनातून नष्ट व्हायला लागल्या आहेत.

खेळासाठी योग्य अशी घरामागील आंगणे रिकाम्या जागा, गॅरेज, जर कुठे असलीच तर ती केरकचऱ्याने भरलेली असतात. कुठेही खेळणे हा मुलांचा स्वभावधर्म असल्यामुळे, ती घराच्या प्रवेशाच्या जागी, इमारतींच्या मधल्या जागी, पायवाटा आणि रस्ते या ठिकाणी खेळताना दिसतात.

वाढत्या वाहतुकीमुळे हालचालीवर खूपच बंधने आली आहेत. त्यामुळे गल्या आणि लहान रस्ते ही मुलांनी खेळायची आवडती ठिकणे.

शाळाही बहुधा वस्तातच असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी त्यांना शाळेचे आंगण, गच्ची, खेळण्यास योग्य अशी शाळेतील मोकळी जागा, मैदान, अशा पद्धतीच्या जागा खेळायला असू शकतात. वस्तीमधून मुले सहजरित्या शाळेत पोचू शकतात. वस्तीच्या गरजा लक्षात घेऊन तेथील मुलांच्या आणि प्रौढांच्या सहकार्याने मुलांसाठी चांगली खेळायची जागा तयार करता येणार नाही का?

**उदाहरणार्थ — उन्नतनगर म्युनिसिपल प्राथमिक शाळा गोरेगाव**



**शाळा**

उन्नत नगर प्राथमिक शाळा हा १३२० म्युनिसिपल प्राथमिक शाळांपैकी बृहन्मुबईतील एक शाळा आहे. त्या मध्ये ७ लाख विद्यार्थी असून तीन भाषांची माध्यमे आहेत. या वस्तीच्या सामाजिक गरजा आणि या शाळेतील जास्त टक्के मुले, ही शिक्षण घेणारी कुटुंबातील पहिली पिढी असल्याने, त्यांच्या घरात शैक्षणिक वातावरण अगर त्या बाबतीत मार्गदर्शन होणे कठीण आहे. हे लक्षात घेऊन महानगर पालिकेने प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी आणि सर्वव्यापी करण्यासाठी समानतेच्या धोरणाचा अवलंब केला आहे.

उन्नत नगर सारख्या बऱ्याचशा लोक वस्तीतील प्राथमिक शाळांना भेडसावणारे प्रश्न म्हणजे मुलांची खूप संख्या, स्वच्छ परिसराचा अभाव आणि बाहेरील मोठ्या मुलांची विध्वंसक वृत्ती.

**भरगच्च वर्ग**

मुलांची संख्या जास्त असल्याने वर्गात जागा अपुरी पडते. पण त्या ठिकाणीच बाहेर असलेल्या जागेचा उपयोग करून घेता येईल. उदा. मोठे आंगण, तीन मोठ्या गच्च्या,मागची मोकळी जागा, बाजूच्या दोन जागा, भोवताली भिंत असलेले आणि खूप झाडे असलेले एक मोठे मैदान. वरील जागांचा मुलांच्या आणि शिक्षकांच्या गरजा पुरविण्यास उपयोग करून घेता येईल का?


बाहेरील गर्दी, आवाज कमीकरण्यास आणि मुलांना बरेच कार्यक्रम उपलब्ध करून देण्यासाठी आपण या मोकळ्या जागांचा उपयोग करू शकणार नाही का?

**अभ्यासक्रमांसाठी या जागांचा उपयोग**

आपल्याला माहीत आहे की मूल त्याच्या भोवतालच्या वातावरणातूनही शिकत असल्याने त्याचे शिक्षण वर्गामध्येच होते असे नाही. वर्गाबाहेरचे शिक्षण हे बऱ्याचवेळा 'अभ्यासक्रमा बाहेरचे' किंवा त्याच्या पुस्तकांशी संबंध नसलेले असते असे मानले जाते. तरीसुद्धा वर्गातील आणि वर्गाबाहेरील शिक्षणाच्या अनुभवांचा संबंध आपण जोडू शकणार नाही का?

**चांगले व्यवस्थापन आणि स्वच्छ राखलेला परिसर**

सामाजिक जीवनाची समृद्धी जबाबदारी पेलण्याने होते. निर्मिति, व्यवस्थापन त्याचा योग्य वापर यामुळे मानसिक




समाधान होते. एखाद्या निष्ठावान प्रौढ गटाच्या प्रयत्नांमध्ये मुलांनी जर जबाबदारीच्या जाणिवेने कांही कामाचा वाटा उचलला तर त्यामधून एखादे चांगले काम उभे राहू शकते. विधायक सामाजिक दृष्टीकोन मिळणे हे सर्वच शिक्षणाचे एक साध्य आहे.

**सुंदर गोष्टींचा विध्वंस, नाश —** शाळेप्रमाणेच वस्तीमध्ये खेळांच्या जागा वस्तीसाठीच असतात. वस्ती आणि आसपासची ठिकाणे यांच्या विकासात जर खरा रस असेल आणि त्या दृष्टीने प्रयत्न केले तर त्या पासून एक उत्तम विधायक कार्य उभे राहील.



**मुलांचा गरजा**

मुलांच्या गरजा जास्तीत जास्त पर्याय व निवड स्पष्टपणे दर्शवितात. खेळाच्या मैदानात असणारे खेळाचे कोणते प्रकार वयानुसार व लिंगानुसार दिसून येतात? त्यांना खेळण्यासाठी किती वेळ मिळतो? त्यांना आतापर्यंत खेळांची निवड करण्याचा किती अनुभव आहे?

— **खेळण्यासाठी मोकळेपणाने हालचाल करण्याची गरज**

मुलांसाठी पळण्याचे खेळ, शिवाशिवी, लपंडाव, उड्या मारणे व झेलाझेली यासाठी सुविधा असाव्या लागतात. हे खेळ साधारणपणे प्राथमिक शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना प्रिय असतात. ती मुले चढण्यासाठी झोका घेण्यासाठी आणि घसरण्यासाठी उत्सुक असतात. शरीराची वेगवेगळ्या स्तरावर होणारी वाढ लक्षात घेऊन मुलांना सुविधा मिळाल्या पाहिजेत.

यामुळे प्रामुख्याने लहान मुलांच्या स्नायूंच्या वाढीला व हालचालींना याच्या वेगवेगळ्या टप्यात हातभार आहे. म्हणूनच त्यांची शारीरिक वाढ होण्यासाठी पूर्वनियोजित साधने उपलब्ध करणे आवश्यक आहे. खेळामुळे मुलांच्या स्नायूंची वाढ व हालचाल होते. वाढीच्या दृष्टीने पोषक ठरते.

"मी असही म्हणू शकत नाही की शारीरिक शिक्षण म्हणजे खेळ कारण मला अस वाटत की रांगेत उभे राहून आवाजाच्या चढ उतारावर व्यायाम करणे किंवा शिक्षकांनी मुलांना मर्यादित क्षेत्र ठरवून देऊन त्यामध्ये कुणी कुणाला पकडायचे हे ठरविणे म्हणजेही खेळ नाही. खेळ हा उत्स्फूर्त असतो आणि त्याचा उगम मुलातूनच होतो. जीमी जॉली.

# खेळाच्या जागांची सुविधा

वयाने मोठा असलेला गट ज्यांच्यापाशी संघटित खेळ खेळण्याची क्षमता आहे. अशांना खोखो, कबड्डी व चेंडूचा खेळ या साठी मोकळी पाहिजे.

शाळेत वयाने मोठ्या असलेल्या गटास चेंडू खेळण्यासाठी मोकळी जागा असणे ही सर्वश्रेष्ठ गरज आहे.

प्रौढांच्या देखरेखीखाली लहान मुलांना जेथे गोंगाटापासून सुरक्षित वाटते अशा ठिकाणी जागेची सोय करणे.

दोरीच्या उड्या, ठिक्कर आणि इतर उडीचे प्रकार, बसून गप्पा मारणे यासाठी मुलींना जागा उपलब्ध करणे.

मुलांना एकमेकांशी संवाद साधण्यासाठी, विश्रांती आणि बसण्यासाठी जागेची गरज आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या वयोगटाप्रमाणे विविध प्रकारची आव्हाने स्विकारण्यास योग्य असे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. हे साध्य होण्यासाठी मुलांचा सहभाग आवश्यक आहे. अशा सहभागामुळे मुलांची आकलनशक्ती वाढण्यास मदत होईल.

**सामाजिक गरजा**

महानगर पालिकेच्या शाळेजवळील बहुतांशी वस्त्या गर्दीच्या व अडचणीच्या असतात आणि म्हणूनच तेथील मुलांना खेळण्यासाठी जागा असणे जास्त आवश्यक असते. गावतील कमी गर्दीची व अडचणीची जागा सोडून तेथील माणसांचा ओढा शहराकडे वाढतो आहे परंतु शहरात येऊनसुद्धा अशा लोकांना नविन जीवनपद्धतिची सुरूवात करता येत नाही. उलट शहरामध्येयेऊन ह्यांना, प्राथमिक सुविधांची कमतरता, पाण्याची टंचाई, गलिच्छ परिसर अशा सारख्या प्रश्नांना तोंड द्यावे लागते. आणि म्हणूनच येथील मुलांचा शारीरिक व मानसिक विकासाची मुख्य जबाबदारी शाळेवर पडते. या दृष्टीने वस्तीचा परिसर स्वच्छ ठेवणे, व्यवस्थित व सौंदर्यपूर्ण दिसणे आवश्यक आहे.

अशा तऱ्हेच्या आदर्श जागा, खेळण्यासाठी तयार झाल्यास शाळेत जाणारी किंवा न जाणारी मुले त्याकडे आकर्षित तर होतीलच परंतु त्याचा पुरेपुर उपभोगही घेतील. मग अशा जागा वस्ती आणि शाळा यामध्ये तयार करणे शक्य आहे काय, की ज्या योगे दोघांचेही समाधान होईल. उदा. अशा जागेची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारी दोघांनी वाटून घेणे. याप्रकारे राहणाऱ्या वस्त्यांमध्ये किंवा सार्वजनिक उद्यानांमध्ये मुलांसाठी खेळाच्या दृष्टिने सुविधा उपलब्ध करताना कुटुंबाना व वस्त्यांचाही पूर्णतः विचार करणे आवश्यक असते.

**खेळाच्या जागांचे नियोजन**

ज्या ठिकाणी मुले आहेत तिथे खेळाच्या कार्यक्रमांना स्थान असते. त्यामुळे मुलांच्या खेळांची गरज भागविण्याचे नियोजन करताना फक्त मैदानांच्या संदर्भात त्याचा विचार न करता जास्त व्यापकपणाने करायला हवा. या गरजेचा विचार फक्त शाळा आणि मुलांच्या घराचा आसपासचा भाग यांच्यापुरता मर्यादित न ठेवता ज्या इतर जागांशीही मुलांचा संबंध येतो त्या बाबतीतही व्हावा. उदा. मुलांची रुग्णालये, मुलांच्या डॉक्टरांच्या तपासणी जागेतील प्रतीक्षा विभाग, दुकानांचे संकुल, रस्त्यावरील कोपरे, इत्यादि.



मुलांसाठी एखादी खेळा करिताच विशिष्ट अशी जागा ठेवलेली असो वा नसो त्यांना बऱ्याच वेळा खेळण्यासाठी जागा सापडतातच. त्यात वहाने उभी करण्याची जागा, जिन्याखाली असलेला अरुंद भाग, रस्ता यांचा समावेश असतो. अशा जागांमध्ये मुले अगदी सहजरित्या, भिंतीवर तोल सांभाळून चालणे, काही पायऱ्या गाळून उड्या मारणे, मातीच्या ठिगाऱ्यावरून गडगडत खाली येणे, डबक्यातल्या पाण्यात खेळणे अशा तऱ्हेचे खेळ करतात. शहरांच्या हद्दीवरील भागात रहाणाऱ्या आणि खेडेगावातील मुलांचे सर्वात आवडते खेळ

म्हणजे वडाच्या पारंब्यांना लोंबकाळणे, त्यावरून वर चढणे, झोके घेणे हे असतात. नदीच्या उथळ पात्रात, ज्या ठिकाणी आया पाणी भरण्यास येतात तिथे पाणी उडवून खेळणे ही त्यांच्या खेळाची सूरुवात असते. काही 'प्रवेश निषेध' जागांमध्ये आणि उजाड ठिकाणांमध्ये मुले तारांचे खांब वाकविणे, खिडक्यांची मोडतोड करणे, भिंतीवर लिहीणे, चिंचेच्या झाडावर दगड मारणे, असे आपल्याला मान्य न होणारे खेळ खेळतात.

आव्हानात्मक आणि मुलांशी संबंधित संधींची कमतरता हे वर निर्देश केलेल्या बऱ्याच बाबतीत असू शकते. मुलांमध्ये भरपूर कृतीशीलता असते आणि त्याची त्यांना जरूरीही असते ही वस्तूस्थिती असून ही मुलांचा त्यांच्या परिसरामध्ये फारच थोडा सहभाग असतो.

मुलांना मर्यादित आणि उत्साहाला मारक असे वातावरण मिळते. त्यांच्या विषयी अनुकंपेची भावना दाखविली जाते. मोठ्या माणसांचा हस्तक्षेपही जास्त प्रमाणात असतो, कांही गोष्टी बाहेरून त्यांच्यावर लादल्या जातात. वरील सर्व गोष्टींचा मुलांवर परिणाम होऊन एखाद्या गोष्टीवर ते फार लक्ष केंद्रित करु शकत नाहीत आणि काहीं निर्मितीची कृत्ये करण्यास ते असमर्थ ठरतात. खूप पटसंख्या असलेले वर्ग बराच वेळ हालचालींना वाव नसणे, गोंगाट आणि मुलांवर परिणाम घडवून न आणणारा अभ्यासक्रम हे घटक शिक्षणाच्या प्रक्रियेस आधारभूत होत नाहीत.



स्नायूंच्या कौशल्यपूर्ण हालचाली ज्या खेळामुळे होऊ शकतात, त्यांची मानसशास्त्राच्या दृष्टीने बुद्धीच्या प्रगतीलाही आवश्यकता असते. या गोष्टीची आवश्यकता विशेषेकरून पूर्व शालेय आणि प्राथमिक स्तरावर असते कारण त्या अवस्थेतच मुलांच्या स्नायूंच्या सर्वांगीण हालचाली वाढीला लागतात. ज्ञानाशी आणि स्नायूंच्या हालचालींशी निगडित असे प्राथमिक वर्षातील अनुभव हे पुढच्या वर्गातील जाण निर्माण करू शकतात.

खेळाच्या एकाच प्रकारामध्ये जितकी विविधता असेल तितकी मुलांमध्ये संशोधनवृत्ती, आव्हान स्विकारण्याची वृत्ती वाढेल. एकाच खेळाच्या साधनाच्या विविध उपयोगातून, मुलांना प्रश्न सोडवणे, प्रयत्न करणे, विधायक विचार करणे या गोष्टी साध्य होतील. अशा तऱ्हेच्या खेळांमुळे फक्त मुलांच्या स्नायूंची सर्वांगीण वाढ होणार नाही तर असे खेळ खेळताना

त्यात मनाचीही गुंतवणूक होऊन अचूक निर्णय घेणे, योग्य निवड करणे या प्रक्रियांनाही चालना मिळेल.

खेळ हे वैयक्तिक विकास आणि सामाजिक संबंध यात संतुलन निर्माण करतात. खेळांसाठी जागांची योजना करण्यामागील उद्देश शारीरिक वाढ आणि बुद्धिचा विकास साधणे हा तर आहेच पण त्या शिवाय मुलांमध्ये समाज जीवनाशी विधायकपणे वचनबद्ध होण्याची वृत्ती निर्माण करणे हा सुद्धा आहे. यामुळे जास्त सहकार्य मिळेल, आत्मविश्वास वाढेल आणि आपण काही साध्य करू शकतो याचा आनंदही मिळेल.

झाडे, रोपे, प्राणी कीटक अशा नैसर्गिक गोष्टींची उपलब्धता व सामाजिक जबाबदारीचे वाटा उचलण्याची तयारी असेल तर असे वातावरण, मुलांमध्ये विधायक काम करण्याची वृत्ती निर्माण करेल. यामुळे विध्वंसक वृत्ती कमी होऊन समाज जीवनाशी सहजपणे चांगला संबंध जुळेल. मुलांची भावनिक आणि सामाजिक गरज वर उल्लेख केल्याप्रमाणे शरीर आणि निसर्ग यांचा संबंध जुळल्यामुळे तसेच इतर मुले आणि मोठ्या व्यक्ती यांच्या उपस्थितीमुळे भागविली जाते.


जबाबदार मोठ्या माणसांच्या सहाय्याने शिक्षण आणि खेळ यातून मुलांना आवश्यक असलेली आव्हाने आणि समाधान मिळते, त्याचप्रमाणे ते जुन्या वस्तूंपासून बनविलेल्या आणि साहसाची संधी देणाऱ्या खेळाच्या मैदानामुळे ही मिळते.

जिथे मुले तिथे खेळ हे असणारच. त्यांच्या हालचालींवर घरात आणि घरा बाहेर पडणारी बंधने वातावरणाचा जास्त उपयोग करून घेण्यास कारणीभूत होतात. उपलब्ध साधनांचा परिणामकारक वापर आणि विशिष्ट कामासाठीच ती राखून ठेवणे या दोन बाबती लक्षात ठेवून स्थानिक अधिकाऱ्यांनी त्याची व्यापकतेने खेळ आणि शिक्षण यांच्याशी सांगड घालून त्यानुसार त्याबाबतीत स्पष्ट धोरण आखले पाहिजे. सी. आय्. डी. सी. ओ. च्या नगरे आणि महानगरे यांच्या विकासाच्या आराखड्याप्रमाणे नवी मुंबई आणि बृहन्मुंबई यासाठी जी १९६४ ची योजना आहे त्यात बदल करून असे सुचवले आहे की १००० लोकसंख्येला अर्धा एकर जमीन उद्याने आणि मैदाने यांच्यासाठी बेट असलेल्या शहरात राखीव असावी. शिक्षण खाते जमिनीचा बराचसा भाग वस्तीमध्ये राखते शिवाय स्थानिक प्राथमिक शाळा वस्तीच्या आसपासच्या भागात असल्याने मुलांना त्या राखलेल्या भागात सहज जाता येते आणि ती तिथे गुंतू शकतात. जिथे मुले आहेत तिथेच सुविधा असणे हे स्वाभाविक आहे. जुन्या वस्तूंचा उपयोग करून खेळाचे मैदान तयार करणे आणि मुलांच्या गरजेनुसार त्याची वाढ किंवा बदल करणे. वाळू, पाणी, झाडे असलेल्या नैसर्गिक भागांचा विकास करणे, तो भूप्रदेश रमणीय करणे हे सर्व शैक्षणिक प्रकल्पांमध्ये येऊ शकतात आणि योजनेचा अनुभव निर्माण केलेल्या गोष्टींची देखरेख, त्याचा वापर असे सर्व खेळ आणि शिक्षण यांच्याशी संबंध असणारे प्रयोग होऊ शकतात.

देशी खेळ, रंगभूमी, कला, हस्त व्यवसाय हे सुरू केले तर त्यांना आवश्यक असणाऱ्या साधनांसाठी परिसरामध्ये सतत बदल होत जाईल, आणि अभ्यासक्रमातील बऱ्याचशा शिकण्यात जिवंतपणा येईल. त्यामुळे मुक्त वातावरण निर्माण होईल. अशा वातावरणाने कृतीशील प्रयोगांना जास्त संधी दिल्याने शिकण्याचा आणि शिकविण्याचा दर्जा उंचावेल. परिसरात बदल घडवून आणण्याची क्षमता त्यांना मिळाल्याने शिक्षक आणि मुले यांचा विकास एकमेका विषयींच्या आत्मविश्वासात होईल.

भारतातील परिस्थितीच्या संदर्भात योग्य अशी नियोजनाची बाब म्हणजे खेळाच्या सुविधांचा फक्त दर्जा लक्षात न घेता त्यांची संख्याही विचारात घेतली पाहिजे. ज्या ठिकाणी सुविधांपेक्षा मुलांची संख्या जास्त आहे तिथे शेजारच्या भागातील दुसरी जागा मिळविणे, खेळांच्या पाळ्या ठरविणे, खेळाच्या लहान जागा सर्वत्र असणे शारीरिक सुविधा साधने आणि खेळप्रमुखांचे नियोजन व सहभाग ही सामाजिक सुविधा, यांच्यामध्ये चांगले व्यवस्थिय संघटन, या गोष्टी जिथे संख्या जास्त असेल त्या ठिकाणी आवश्यक आहेत.

वस्तीचा सहभाग, आसपासचा भाग आणि मुले यांच्या मुळेच खेळांच्या जागांचा विकास आणि वाढ होईल.



**उदाहरणार्थ — उन्नतनगर म्युनिसिपल प्राथमिक शाळा गोरेगावचे मैदान**

खेळाच्या जागेच्या नियोजनाची सुविधा ही ज्या मुलांसाठी करावयाची आहे त्यांच्यावर अवलंबून असते. खेळांसाठी विशिष्ट स्थान निश्चित करणे, त्या भागाचे नैसर्गिक वैशिष्ट्य, त्याचा परिसर, सुलभता आणि सुरक्षितता हे पण लक्षात घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रौढांची घ्यावयाची जबाबदारी आणि सहभाग, जागेची काळजी आणि व्यवस्थापन हे सुद्धा नियोजनावर परिणाम करू शकते.

**खेळांच्या नैसर्गिक जागा:** झाडे, भिंती, मातीचे ढिगारे, रोपांच्या लागवडींची जागा, मोठे दगड इ. सारख्या नैसर्गिक गोष्टिंचाही आराखड्यात अंतर्भाव करता येईल. उदा. मातीच्या ढिगाऱ्यावर मुले चढू शकतात आणि घसरण्यासाठी अशी जागा उत्तमच. भिंती असल्यावर मुलांना बसायला, त्यावर चालायला किंवा त्याच्यावरून उड्या मारण्यास गंमत वाटते. गवत व माती असल्याने मुले पडली तरी त्यांना इजा होत नाही.

शाळेसमोरील खेळाचे मैदान म्हणजे एक आयाताकृती सारखी जागा (१५३'×२७०') ज्याच्या तिन्ही बाजूस झाडे आहेत. त्याच्या मध्यभागी एक मोठी वर्तुळाकार गवत न उगवणारी अशी जागा आहे.

मैदानात खेळणारी मुले २ ते ३ वर्षापासून कुमारवयापर्यंतची आहेत. छोटी मुले आपापल्या मोठ्या भावंडांबरोबर निरनिराळे खेळ खेळण्यास येतात. मोठी मुले साधारणपणे क्रिकेट खेळण्यासच येतात आणि ती दिवसा वेगवेगळ्या संख्येने खेळत असतात पण कमीतकमी १५ ते २० तरी शाळा सुरू असताना खेळतात, तर शंभराच्या वर मुले संध्याकाळी किंवा शाळा भरण्या आधी आणि सुटल्यावर त्या खेळाच्या मैदानाचा उपयोग करीत असतात. आजूबाजूच्या भागातील मोठी मुले क्रिकेट खेळण्यासाठी मध्य भागातील वर्तुळाचा आणि सरावासाठी दोन कोपऱ्यांचा वापर करतात. मधला वर्तुळाकार भाग हा क्रिकेटसाठी आखला होता हे उघडच आहे.

मैदानातील झाडे व त्यांची सावली असलेले कोपरे प्रमुख्याने चढण्या उतरण्याच्या खेळांच्या साधनासाठी आदर्श ठरली. हे सर्व शाळेच्या कचेरीपासून व शाळेच्या इमारतीपासून दूर असल्याने त्याचा कुठलाही त्रास झाला नाही. आमच्याकडील आराखड्यांना लागणारे मुख्य सामान हे जुने टायर्स असल्यामुळे त्याचा उपयोग वस्तीतील मुलांचे कमीत कमी तांत्रिक कौशल्य वापरून आम्ही केला. खाली दाखविल्याप्रमाणे त्याचा एक आराखडा तयार झाला.

चढण्या उतरण्याच्या खेळांमध्ये हात पाय आणि पाठीचे सर्व स्नायू यांचा योग्य वापर होतो शिवाय त्यातून विविध स्तराची आव्हाने स्वीकारण्याची सवय होते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या पातळ्यांच्या मंचकांमुळे उंची व रुंदी समजण्याची विशिष्ट क्षमता तयार होते. ह्या खेळामध्ये वेगवेगळ्या दर्जाची आव्हाने देणारे मार्ग आणि खाली उतरण्यासाठी सुरक्षितता ह्याची मात्र व्यवस्था केली पाहिजे.





इतर क्रीडा प्रकारांशी हे कसरतीचे खेळ निगडित आहेत. हे कसरतीचे खेळ जमिनीपासून केवळ २ फूट उंचीवरून करायचे असल्यामुळे संपूर्णपणे सुरक्षित आहेत.

कसरतीच्या खेळांमधल्या अगदी सुखातीच्या प्रयत्नांमधला एक महत्वाचा क्रीडा प्रकार म्हणून दोरीवरच्या तोलसांभाळण्याच्या कसरतीच्या खेळाकडे अंगुलीनिर्देशन करता येईल.

इतर प्रकारांच्या तुलनेत हा प्रकार तसा बराच कमी सर्चाचा आणि सहजशक्य असा आहे. याच्यात वैविध्य आणणंदेखील फारसं कठीण नाहीं. 'टारझन' शैलीतला झोका, अनेक मुलांना एकाचवेळी झोके काढता येतील असा मोठ्या आकाराचा टायरच्या स्वरूपातला झोका, दोन झाडामधला दोरीचा पूल या सगळ्या क्रीडा प्रकारांमधून मुलांना निखळ आनंद मिळाला हे जरी खरं असलं तरी त्या सर्वच प्रकारात मुलांवर देखरेख ठेवणं आवश्यक बाब होती आणि त्यामुळच ते प्रकार फार काळ टिकून राहू शकले नाहीत.

सुताच्या किंवा नायलॉन धाग्यांच मिश्रण असलेल्या दोऱ्या फारकाळ टिकत नाहीत. खास करून मुलांनी गजबजलेल्या मैदानावर तर त्यांचा तसा फारसा उपयोग नाहीच. त्यामुळं आम्ही बऱ्याच ठिकाणी दोऱ्यांऐवजी साखळ्या आणि दोरखंडांचा वापर करून पाहिला.


दोऱ्या काय किंवा जाड जाळी. काय-दोन्ही गोष्टी आकषर्क



एकमेकांशी जोडलेले, विविध उंचीवर मंचक असलेले, वेगवेगळ्या ठीकाणी सुरूवात करण्याची सुविधा असलेले, लाकडी बांधणीचे खेळ अधिक उत्साहवर्धक असतात. आमच्याकडे असलेले टाकाऊ साहित्य म्हणजे मुख्यतत्वे टायर्स असल्यामळे आणि झाडांच्या आधाराने त्याचा वापर करावयाचा असल्यामुळे, स्कू आणि बोल्ट यांची आवश्कयता होती. टायर मध्यभागी कापणे कठीण असल्यामुळे मोठ्या सुरीने, त्यात भोके पाडावी लागतात आणि नंतर त्या भोकांमधून स्क्रू आणि बोल्टच्या सहाय्याने ते बांधावे लागतात.


जे टायर उघड्यावर असतात त्यांच्या तळाशी पाणी जावे म्हणून भोकें ठेवावी लागतात. झाडांना ज्या साहित्याच्या सहाय्याने टायर जोडलेले असता त्या साहित्यामुळे मुलांना इजा होऊन नये म्हणून त्याचीं टोकें टायरच्या बाहेर येणार नाहीत याची काळजी घ्यावी लागते. म्हणून अशा वेळी लॅग स्क्रू आणि वॉशर वापरले जातात.

लॅग स्क्रू 3/8"×3"
वॉशर 3/8"×2"
टायरच्या स्वरूपातल्या झोक्यावरून उड्यामारणं, टायरच्या मदतीनं तुळईवरून. तोल सांभाळत चालणं, दोरीवरून चालणं अशा वेगवेगळ्या तोल सांभाळच्या कसरतीच्या प्रकारातून ·




शरीराची लवचिकपणा प्रदर्शित होतो.






क्रीडा प्रकार उपलब्ध करून देऊ शकतात. पण एक गोष्ट मात्र ध्यानात ठेवायला हवी — आणि ती म्हणजे या दोन्हींवर मर्यादेच्या बाहेर ताण पडणार नाही याची खास दक्षता घ्यायला हवी.

जिथं जिथं मुलांची संख्या मोठी असेल तिथं 'झोपाळे' हा खेळ अतिशय प्रिय ठरतो. पण दीर्घकाळ हे झोपाळे/झोके चांगल्या अवस्थेत टिकवून ठेवणं ही गोष्ट मात्र खूप कठीण असते. एकतर झोपाळ्यांसाठी मागे-पुढे झोके घेण्यासाठी खूपशी जागा आवश्यक असते. अन्यथा 'आपटा-आपटी' अशासारखे अपघाती परिणाम भोगावे लागतात. झोपाळयाच्या उंचीच्या कमीतकमी दुप्पट इतकी जागा-मागे आणि पुढे उपलब्ध असल्याशिवाय या झोपाळ्यांचा कांहीच उपयोग नाहीं.

दोऱ्यांचे आणि टायरचे झोके विशेषतः मोठ्या टायरचे झोपाळे खूपच आनंददायी आणि मजेदार वाटले. जेव्हा दोऱ्या झिजल्या-तुटल्या, टायर्स दबूनदबून सपाट झाले तेव्हा मुलांनी आपापल्या परीनं त्या क्षणाला जे सुचतील ते उपाय करून वेळ मारून नेली. दोरांना गाठी मारल्या-झोक्यांना मजबूती येण्यासाठी कांही जड वस्तू बांधल्या आणि हे करून त्यां झोक्यांची क्षमता कितपत टिकून आहे हे पडताळून पाहण्यासाठी एकाचवेळी ८-२० मुलांनी झोंबाझोंबीही केली.

'टारझन' झोक्यांसारख्या उभ्या-उभ्या-मुक्त-स्वैर झोके घेण्याचा आनंद देणाऱ्या झोपाळ्यांवर देखरेख मात्र ठेवावीच लागते. एकंदरीतच 'झोपाळे' या खेळात कितीतरी विविधता आणता येते. झोपाळा बांधण्याची पद्धत, त्यात वापरलेली बेअरिंग्ज, आधारासाठी वापरलेल्या तुळ्या (बीम्स), साखळ्या यांवर त्या झोपाळ्यांचा दणकटपणा-क्षमता-सामर्थ्य अवलंबून असतं.

जसे जसे क्रीडाप्रकारातले पर्याय वाढूं लागले तसतशी मुलं मैदानावर विखुरली आणि आपल्या आवडीच्या खेळात रममाण झाली.

दोन स्टीलचे खांब एका झाडाला अडकवून ही घसरगुंडी तयार करण्यात आली आहे. झाडालाच चिकटून असल्यामुळे मुलांना झाडाच्या फांद्यांवरून चढून जाऊन या घसरगुंडीच्या उंच भागी अगदी सहजपणे पोचता येतं. आणि स्टीलच्या खांबाच्या उतारावरून अगदी मजेत घसरत घसरत खाली येणं शक्य होतं.



किती अंतरावरून खाली पडायचं आहे - कोणत्या पृष्ठभागावर पडायचं आहे, त्याचा कितपत आघात होणार आहे या आणि अशा इतर कांही महत्वाच्या बाबींवर घसरगुंडीच्या उंचीबद्दलचे निर्णय अवलंबून असतात. सर्वसाधारणपणे ६४ इंचाची उंची घसरगुंडीसाठी प्रमाण मानली जाते.

घसरगुंड्यांचे प्रकार ही तसे अगणितच!
'शूट', 'वेव्ह' 'वाईडपेअर्ड' 'नैसर्गिक उतारं' असे कितीतरी प्रकार डोळ्यासमोर येतात. या सगळ्यात घसरगुंडींच्यावर चढण्यातली आणि उतरण्यातली सुगमता या दोन गोष्टींचा बारकाईन विचार व्हायला हवा.

विविध वयोगटातल्या मुलांना निरनिराळ्या प्रकारच्या घसरगुंड्या उपलब्ध करून नवीन नवीन आव्हानांना सामोरं जायला लावणं हे केव्हाही उचितच ठरते.

वाळू पसरलेल्या जागी एखाद्या मातीच्या ढिगाऱ्यावर अथवा लहानशा टेकडीवर छोटीशी घसरगुंडी बांधणं म्हणजे छोट्यांना एका सुरक्षित आव्हानाला सामोरं जाण्यास संधी उपलब्ध करून देण्यासारखंच आहे. घसरगुंडीला लागूनच पायऱ्या असतील. आम्ही अजून असा उंचवटा बांधत आहोत.






जसजशी खेळाच्या मैदानासमोरील भागात खेळाची विविध साधनं-उपकरणं-वाढत गेली तसतसा सततच्या वापरामुळं मैदानातला फाफटपसाराही कमी होऊ लागला. मैदानातले दगडही आम्ही उचलून बाजूला केले. त्यामुळं उड्या मारतांना, वरून खाली सूर मारतांना आम्हाला कोणालाही ईजा पोहोचू शकली नाही.

मैदानावर हिरवळ-वाळू पसरली असेल, मऊ माती लकडी, भुस्सा पसरलेला असेल तर साहजिकच उंचावरून खाली जमिनीवर पडल्यांन होणारा आघात तितका धोकादायक ठरत नाही. एक फूट खोली साठी गवत (हिरवळ), मऊ माती (चिकण माती) आणि वाळू या नैसर्गिक गोष्टी उपलब्ध आहेत.

जमीनीत हवा टिकून राहावी तसंच जमिनीची शोषणशक्ती कायम राहावी यासाठी अधूनमधून जमिन खणून मातीचे थर खालीवर करणं आवश्यक ठरत. इमारती जवळची जागा-जिथं मुलं गोट्या-ठिकऱ्या असे खेळ खेळत असत-ती अजून ही मोकळीचं होती. अर्थातच यामुळं आपापल्या आवडत्या खेळांच्या जागा कुठल्याच गटाला सोडून द्यायला लागल्या नाहीत.

गोट्या-चेंडू-दोरीच्या उड्या यासारखे खेळ मुलांना खूपच प्रिय असल्याचं घ्यानात घेऊन शाळेतल्या चारही विभागांना ही खेळाची साधनं उपलब्ध करून देण उचित वाटलं.





**मागची जागा**

खाज कुयलीच्या झाडांची गर्दी असलेली आणि शिळपाकं-फुकट गेलेले अन्नपदार्थ भिंतीवरून फेंकून दिल्यामुळे इतस्तः पसरलेले. अशा अवस्थेतली ही जागा अत्यंत निरुपयोगी होती.अशा अवस्थेतल्या जागेवर शाळेनं संपूर्णपणे पाणी सोडलं होतं. एवढंच नाही तर सापांच्या भितीपोटी अशा जागेत प्रवेशदेखील निषिद्ध ठरवला होता.

— अस्वच्छ आणि निरुपयोगी झाडाझुडपांनी व्यापलेली ही जागा मुलांना नेहेमीच धोकादायक ठरते. ही जागा 'प्रवेश निषिद्ध' ठरवण्यात शिक्षकांना वाटणारी चिंता समजण्यासारखी होती.

इतस्तः पसरलेली घाण-केरकचरा यामुळं या जागेवर सतत अधिकाधिक घाण-कचरा वाढत राहिला, मुलांच्या खेळण्याच्या जागेजवळची ही 'प्रवेश निषिद्ध' जागा साफ करून सुरक्षित करणं अपरिहार्यच ठरतं.

साफसफाई करणं हे एक फार मोठं काम होतं. सुरवातीला संबंध शाळा या कामाबाबत उदासीन होती. पण नंतर हळूहळू शाळे मागे बाग तयार करण्यासाठी योजनाबनूं लागली बैठका घेण्यात यश लागलं. कर्मगतीनं कां होईना — कमीतकमी उपकरणं वापरून का होईना — एकदाचं या 'प्रवेश निषिद्ध' जागेच्या साफसफाईचं काम सुरुं झालं. खाजकुचलीची उपद्रवी झांड तोडण्यात आली नंतर जाळण्यात आली. अशी पडीक

जमीन साफ करण्यासाठी जमीन उकरून काढण्यासाठी — दगड-विटा-कचरा उचलून नेण्यासाठी फावडी-कुदळ अशासारख्या साधनांची गरज असते. पण शाळेकडे मात्र ही साधनं पुरेशा संख्येनं उपलब्ध नव्हती-कमीतकमी होती. मग जुन्या बादल्या, ताडपत्री, भांडी अशांचा दगड-विटा-कचरा उचलून फेकून देण्यासाठी वापर करण्यात आला. हळूहळू शाळेच्या मागच्या भिंतीपलीकडे फेकण्यात येणारा कचरा कमी होऊं लागला. मुलांसाठी वापरायची जागा साफ-स्वच्छ झाली. ८- ९ वर्षांच्यालहान मुलांनी दगड-विटा-उचलण्याच्या कामी दाखवलेली चिकाटी-परिश्रम निव्वळ अतुलनीय होते.

अखेरीस उन्नतनगर शाळांच्या संकुलात प्रत्येक शाळेला एक असे एकूण ४ प्लॉट्स कुंपणं लावून तयार झाले.

पाण्याची पाईप लाईन मिळवण्यात आली. गंभीर दुर्लक्ष्य आणि चुका यामधूनच आता आम्ही हळूहळू आमच्या बागबगीचांना सुशोभित ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी शिकत आहोत.

जमिनीचा वरचाथर पातळ होता. 'खावण्याच्या' धोरणाचा अवलंब केला. कारण वरच्या थरातली माती जमीन तसंच कॉम्पोस्ट दुसऱ्या ठिकाणाहून आणण आम्हाला अशक्य होतं. जमिनीच्या पृष्ठभागावरचे मोठेमोठे दगड बाजूला करून फेकून देण आवश्यक होतं. आम्हाला नैसर्गिक खतं, काळी खताची माती, कॉम्पोस्ट अशा जमिनीचा कस सुधारू शकणाऱ्या गोष्टींची आवश्यकता आहे.

आमच्या जमिनीचा 'कस' ओळखण (जाणून घेणं) ही एक अतिशय दीर्घ प्रक्रिया होती.

पाण्याचा योग्य प्रमाणात शिडकाव आणि खणून खणून भुसभुशीत झालेली जमीन या मुळं एरवी लक्ष भासणाऱ्या रोपट्यांवरही तजेला दिसू लागला आहे. पहिल्या पावसानंतर पालापाचोळा-वनस्पती वगैरे कुजून जमिनीत काळी माती तयार होऊं लागली आहे. पण तरी ही आणखी झाडांची लागवड, जमीन खणणं, खतांची भर पडणं आवश्यक आहे.

जमिनीचा कस सुधारण्याच्या कामात आम्हाला बरचसं कांही शिकायला मिळालं —

(1) प्रति चौरस फूट जमिनीत जितके कमी दगड तितकी झाडांची वाढ चांगली होते.

(२) जमिनीत बाष्प असणं आवश्यक आहे. म्हणून व पाणी जमिनीत शिरू देणं हितांच आहे. सांडपाण्यामुळे आतल्या मातीचा कस सुधारू शकतो.

(३) बागेतल्या छोट्या छोट्या रोपट्यांवरून चालण्याची आमची इच्छा नसल्यामुळे या रोपट्यांच्या दोन्ही बाजूंना जमिनीत घट्ट दगड बसवून चालण्यासाठी सुरक्षित मार्ग बनवता येईल.

(४) रानटी (निरुपयोगी) झाडं-झुडपं-गवत बागेत केव्हा वाढतं हे कळतही नाही.



झाडांच्या फांद्या-पालापाचोळा, प्राण्यांची हाडं, बटाटयाची सालं असे सेंद्रिय आणि असेंद्रिय पदार्थ तसंच झाडांची पानं यांच्यापासून कॉम्पोस्ट खताचे ढीग बनवायला आम्ही शिकलो.

जमिनीतल्या दगडी भागावरचा मातीचा थर अजून ही पातळच आहे. गेल्या कांही महिन्यांत या गोष्टीची शिक्षकांनी तसंच विद्यार्थ्यांनी गंभीर दखल घेतली आहे.

हळूंहळूं शाळेच्या नियमित अभ्यासक्रमात 'बागकाम' हा विषय मिसळूं लागला आहे. नावं ओळखणं अवलोकन-परीक्षण आणि लागवडीची तंत्र आदी गोष्टी आत्मसात होऊं लागल्या ओहत.

उन्नत नगर इथल्या हिंदी विद्यालयाच्या बागकाम प्रकल्पाच्या नियतकालिकात प्राचार्य सिंग लिहीतात —

''श्रीयुत दशरथ आणि श्रीयुत राम या दोघा शिक्षकांवर बागकाम प्रकल्पाची जबाबदारी सोपवून मी या प्रकल्पाचा शुभारंभ केला. बागकामासाठी ते ठरावीक गट निवडून त्यांच्याकडून कामं करवून घेत आणि दिवसभर केलेल्या कामाचा तपशील मला दररोज देत. इथल्या जमिनीची स्थिति अतिशय खराब होती. ९ ते १० वर्षे वयोगटातल्या ४ थ्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी खडतर परिश्रम करून इथली जमीन लागवडीसाठी योग्य बनवली. आज तिथं तयार झालेली नयनमनोहर बाग सर्वांचींच मनं मोहून टाकते.

जमीन खणणं, पाणी घालणं, कुंपणं बनवणं, छोटीछोटी रोपं-भाजीपाला-फुलझाड़ लावणं आणि या झाडांची सतत डोळ्यात तेल घालून काळजी घेणं या बागेतल्या विविध कामांमधे मुलांनी खूप रस घेतला. जागेवर माया केली. मुलांनी घेतलेले हे परिश्रम पाहून मी अतिशय प्रभावित झालो आहे. त्यांचं रोजच्या बागकामाचं स्वरूप हे असं होतं —

रानटी झाडं-झुडपं-गवत खुरपणं, दगड वेचून बाजूला करणं, जमिनीचा पृष्ठभाग सारखा बनवणं, वेगवेगळे पाट काढणं, 'कुपणं बनवणं, पाणी साचून सहण्यासाठी छोटे खंदक खणणं, पाणी घालणं, झाडाना खतं देणं इत्यादि —

**परीक्षण:**

बागेत मन लावून केलेल्या कामामुळं, मुलांची अवलोकन शक्ती अधिक तीव्र बनली. त्यांचा उत्साह वाढला-त्यांना मनस्वी आनंद मिळाला. शारिरीक विकास आणि भावनिक विकास या दोन्हींसाठी मुलांचं उत्साही-आनंदी बनणं अतिशय आवश्यक होतं. मुलांची सतत चाललेली बडबड आणि ओसडून चाललेला आनंद यातून सहज लक्षात येतं की 'बागकाम' मुलांना खूपच आवडत असलं पाहिजे,

शारिरीक परिश्रमांद्वारे त्यांची शारिरीक कार्यशक्ती नक्कीच वृद्धिंगत होत असली पाहिजे. त्यांचा आत्मविश्वासही दिवसेंदिवस वाढत असला पाहिजे. शाळेतली ही मुलं त्यांच्या झाडा- झुडपांवर खूपच प्रेम करताना दिसताहेत.

पर्यावरणाविषयी जागरूक राहून, चिकित्सक वृत्तीनं ते अधिकाधिक सुखावह कसं बनवता येईल हे शिकण्याची संधी त्यांना मिळते. असं मला वाटतं.

अगदी नकळत मुलं झाडा-झुडंपाच्या विश्वात मशगूल झाली आहेत. त्यांची अधिकाधिक चांगली वाढ कशी होईल, बी-बियाणी, मूळ, जमिनीतून शोधून घेतलेल्या क्षार-पाण्यामुळं होणारी त्यांची वाढ, पाणी-सूर्यप्रकाश-खतं आणि त्यांचा उपभोग अशा वैविध्यपूर्ण गोष्टींचं ज्ञान त्यांना सहजपणे उपलब्ध होत आहे.

विशेष मार्गदर्शन नसतानाही अनुभवातून मिळणाऱ्या शिक्षणातून ही मुलं रोज कांही तरी नवीन नवीन कल्पना प्रत्यक्षात आणत आहेत.

मला असं वाटतं — मुलांचा शाळेतल्या बागकामात हा

उत्साह त्यांच्या घराघरातूनही पसरेल आणि या मुलांचे पालक माझ्या या मुलांचं कौतुक करतील — त्यांना आपल्या मुलांचा अभिमान वाटेल. (श्री. सिंग-१०-१-१९८९) उन्नतनगर विभागातल्या ४ शाळांपैक श्रीयुतसिंग यांचं हे एक हिंदी विद्यालय. त्यांच्या शाळेत केवळ ४च वर्ग आहेत. ४थ्या इयत्तेत शिकणारी ९ वर्षे वयाची मुलं म्हणजे शाळेतली सर्वात मोठी मुलं!

सर्व शाळातल्या मुलांनी घेतलेले परिश्रम आणि दाखवलेला अखंड उत्साह यामुळं शाळांच्या मागच्या बाजूची अतिशय अस्वच्छ आणि घाणीनं बरबटलेली जमीन आतां शोभिवंत बगीच्यांमुळं सर्वांचीच मनं प्रसन्न करून टाकते आहे. झाड आणि मुलं एकत्र वाढली पाहिजेत या आमच्या विश्वासाला यामुळं साहजिकच पुष्टि मिळाली आहे.

या बागकाम प्रकल्पाच्या कार्यवाहीमुळं शाळेच्या अभ्यासक्रमातल्या विज्ञान-तंत्रज्ञान-कला-काव्य साहित्य आदी विषयांचा सुरेख संगम साधला गेला आहे. वेगवेगळ्या झाडांच्या पानांचे उपयोग आणि त्यांचं औषधी महत्व यांचं ज्ञान मुलांना सहजपणे मिळाल्यानं भारतीय संस्कृतीमधील जनसामान्यांसाठी अतिशय संपन्न अशा औषधांचा खजिना आता लोकांपुढं आला आहे. कांही ठराविक फुलं तसंच पानं कांही उत्सवांसाठी तसंच धार्मिक सोहळ्यांसाठी वापरण्यात येतात. या प्रकल्पामुळं मुलांच्या ज्ञानात लाखमोलाची भर पडत आहे. या परिसरातल्या सर्वच शाळांनी बागकाम प्रकल्प हिरीरीनं चालवले आहेत. आणि तिथेल शिक्षक या प्रकल्पाचा विस्तार कसा करता येईल याची योजना सध्या आखण्यात मग्न आहेत.


कडेच्या क्षेत्रात लावलेल्या झाडामुळं सावली तर मिळेलच. शिवाय परिसराला एक प्रकारचा थंडावाही लाभेल. शाळेच्या इमारतीच्या परिसरात नवीन फुलझाड लावून तो सुशोभित करण्याच्या योजनाही विचाराधीन आहेत. यामुळं छोट्या वयोगटातल्या मुलांना वाळूत खेळणं.

बागडणं-उड्या मारणं-तोल सांभाळून चालणं, हस्तव्यवसाय, कला आदी गोष्टीत रस घेणं सहजशक्य होणार आहे. परिसरातल्या दाट झाडा झुडपांमुळं लपाछपीचा खेळही अधिक मजेशीर बनू शकेल. विविध गंध-रंग आणि आकार असलेली पानं-फुलं मुलांना निखळ आनंद देऊं शकतील. शाळेच्या इमारतीच्या बाहेरील भाग आणि आंतला परिसर यामधील जागाही आता झाडा-झुड्यांनी सुशोभित करता येईल.

केबल स्पूल टेबल, टायर सीट्स, यथेच्छ बागडता येईल अशी कुपण लावलेली मऊ मऊ वाळूनी भरलेली खोलगट जागा, झाडांवरच्या बॉक्स शिड्या अशा विविध नवीन खेळण्याच्या सोयी उपलब्ध करून देण्याचं काम सध्या चालू आहे.

लहान विद्यार्थ्यांच्या वर्गाला लागूनच ही क्षेत्र असल्याकारणानं, आकाशदर्शन व्हावं, सूर्यप्रकाश मुबलक मिळावा म्हणून झाडांची लागवड करतांना त्यांची उंची-विस्तार वगैरे गोष्टींचा खास विचार व्हायला हवा.

झाडांच्या सावलीच्या थंडाईचाही लाभ मिळावा आणि समोरच्या मैदानातले खेळ व्यवस्थित पाहता यावेत असा दुहेरी हेतू मनात बाळगून योजनांची अंमलबजावणी करायला हवी. वर्गात विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळं कांहीं विद्यार्थ्यांना वर्गाच्या बाहेरच्या जागेत बाकं टाकून बसावं लागलं तर त्यांना संपूर्ण आराम मिळेल असंच वर्गाबाहेरचं वातावरण ठेवण्यात यावं. सूर्यप्रकाश आणि सावली यांचा यथायोग्य संगम बाहेरचा परिसर आणि आंतला परिसर यांना जोडणाऱ्या वर्गांच्या परिसरात व्हायला हवा. सौंदर्याची मुक्त उधळण बालक-बालिकांनी गाजवलेल्या या परिसरात व्हायला हवी. या







परिसरात मोठ्या प्रमाणात मऊ मऊ वाळू पसरल्यानं मुलांना इथं बसायला-नाचायला-बागडायला-धडपडायला पूर्ण स्वातंत्र्य आहे. वाळूला आकार देता येतात किल्ले बनवता येतात. वाळू एकमेकांच्या अंगावर उडवता येते थोडक्यात सांगायचं तर मुलांना एक आगळावेगळा आनंद अनुभवता येतो.

वाळून खेळतांना पाईप्स, भांडी (छोटी) गाळणी, बांबूचे तुकडे-छोटे बॉक्सेस, नारळाच्या करवट्या वगैरे गोष्टी ही खेळाचा आनंद द्विगुणित करतात.

**बैठे खेळ (घरात बसून खेळण्याचे) खेळण्यासाठी जागा, तसंच घरा सभोवतालचं अंगण, घरावरली गच्ची आणि घरातली दोन-तीन खोल्यांना जोडणारी जागा —**

मोकळ्या जागांचा लोक पाहिजे तसा उपयोग करून घेतात. आपापल्या गरजांनुसार लोक या मोकळ्या जागांमधे परिवर्तन घडवून आणतात.

शाळांमधल्या वर्गांमधे जर खूप गर्दी होते आहे असं वाटत असेल तर इतर ठिकाणच्या (मोकळ्या) जागांचा नवनिर्मितासाठी यथायोग्य उपयोग करून घेता येतो.

खेळ खेळण्याच्या जागांमधलं तसंच क्रीडा प्रकारांमधलं वैविध्य — परिस्थित्यनुरूप केलेले बदल यामुळं मुलामुलींच क्रीडाकौशल्य-क्षमता निपुणता वाढत जाते.


घरातल्या तसंच इमारतीतल्या भिंतीमधले कोनाडे-कोपरे जिन्याखालील जागा. घरामधली तसंच इमारतीमधली कॉरिडॉर्सच्या स्वरूपातली जागा अशा विविध जागांचा यासाठी विचार करता येईल.

दाटीवाटीनं उभ्या असलेल्या इमारतींमधल्या बऱ्याचशा जागान दुलक्षित राहतात.

घरातला दिवाणखाना तसंच घरा सभोवतालची जागा तसंच अशाय प्रकारच्या आणखी कांही जागा यांचा ज्यास्तीत ज्यास्त वैविध्यपूर्ण उपयोग करून कसा, घेता येईल इकडे लक्ष ठेवायला हवं.


उन्नतनगर शाळेचं मध्यवर्ती अंगणही लक्ष वेधून घेतं. या अंगणाच्या चारही बाजूंना शाळेचे वर्ग आणि छोटे छोटे कॉरिडॉर्स आहेत. संपूर्णपणे मोकळ्या अशा या अंगणात मुलं गेम्स खेळण्याची हौस पूर्णपणे भागवून घेऊ शकतात.

मागे उसळून येणारे गोलाकार (चक्राकार) टायर्स, त्यामुळं मधली मोकळी जागा ध्वजवंदन तसंच अशाच इतर कांही समारंभासाठीही वापरता येते. रस्त्यावर खेळण्यात येणारे ठिकऱ्यांसारखे खेळही इथं खेळता येतात. विविध प्रकारचे खेळ इथं खास तयार करण्यात आले आहेत.* भींतींवरच्या काळ्या फळ्यांवर अक्षर ओळख तसंच नवनवीन शब्दांची रचना करतायावी म्हणून विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



*"*प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी* सडके वरील आणि पारंपरिक खेळांचा उपयोग.- अरूणा ठक्कर 1987







मराठी विद्यालय क्रमांक २ च्या प्राचार्य श्रीमती प्रभु म्हणतात —

'शाळेत नव्यानं प्रवेश करणारी छोटी छोटी मुलं खूप वेळ शाळेत बसल्यावर कंटाळतात. त्यामुळं उड्या मारत — हसतखेळत-नाचत बागडत अक्षर ओळख आणि स्वरांची ओळख तसंच आकड्याची ओळख करून घेतांना या मुलांना कंटाळा येत नाही. अशा वातावरणात नुसतेच जुने शब्द पाठ करण्यापेक्षा, स्वतःहून नवीन नवीन शब्द बनवण्याचा मुलांचा प्रयत्न कौतुकास्पद ठरतो. उच्चार-लेखन-मोजणी या सगळ्यात होणाऱ्या चुका एकमितपणे सुधारल्या जातात आणि त्यामुळं त्या पुन्हा पुन्हा होत नाहीत—'

शिक्षिका श्रीमती कोरिया यांना छोट्या वयातल्या मुलांना उपलब्ध करून दिलेले सर्व खेळ अतिशय योग्य वाटतात. 'पण प्रत्येक जण इथं खेळण्यासाठी उत्सुक असल्यानं आणखी कांहीं वेळ हवा असं वाटतं. मोठ्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना आणखी गंभीर अडचणींना तोंड देता यावं अशा प्रकारे कांही योजना आखल्या जाव्यात' असं त्यांचं म्हणणं—

गुजराती शाळेच्या गच्चीवर गेम्सची सोय करण्यात आली आहे. या भाषेची अक्षर वेगळी असल्यानं त्यांना वेगळ्या जागेत जास्त आनंद मिळतो. शिकवण्याच्या पद्धतींमधे सतत कांहीतरी उपयुक्त बदल घडवून आणण्याचा शाळेतले शिक्षक प्रयत्न करत असतात. प्रशस्त अंगण मध्यभागी असल्यामुळे 'थिएटर'साठी अगदी योग्य अशी जागा उपलब्ध झाली आहे. तसंच पपेट्स म्हणजेच 'कठपुतली' हा खेळही इथं अगदी व्यवस्थितपणे दाखवता येतो. 'खेळ' सुरू होतांना पडदेवर-खाली करता येतात. आणि जेव्हा जेव्हा असा खेळ सुरू होतो तेव्हा तेव्हा आजूबाजूच्या वर्गातली मुलं इथं येऊन बसतात—

शाळेतल्या शिक्षक-शिक्षिकांनी 'इतिहास' नाटुकल्यांच्या माध्यमांतून अधिक प्रभावीपणे मुलांपर्यंत पोहोंचवण्याचं



आव्हान स्वीकारल आहे. सर्व मराठी हृदयांना अतिशय प्रिय असा श्री छत्रपती शिवाजी महाराजांवर इयत्ता ४ थी चा इतिहास रचलेला आहे. मराठी रंगभूमी मुंबई शहरात अभिमानानं ताठ उभी आहे. शाळेतले शिक्षक (मराठी) आणि विद्यार्थी दोघेही कांही उत्कृष्ट ऐतिहासिक नाटकं या मध्यवर्ती प्रांगणात सादर करण्याचा मानस बाळगून आहेत.


आपल्या दैनंदिन जीवनात पौराणिक कथा-धार्मिक कथा यांच स्थान मोठं आहे. उत्सव-सोहळे, मंदिराना भेटी, राष्ट्रभक्तीपर गाणी या सगळ्यांतून निखळ आनंद प्राप्ती होते. साहजिकच अशा गोष्टी शाळांमधून विद्यार्थ्यांपर्यंत पोंहोचणं आवश्यकच ठरतं.

राजस्थानी कठपुतलीचा खेळ, चामड्याच्या कठपुतल्यांचा खेळ, दिव्याच्या प्रकाशातले सावल्यांचे खेळ, मुखवट लावून केलेली नृत्य, रस्त्यावरची नाटक, वाद्यवृंद या सगळ्यांचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पाठ पुरावा केला जातो.

## साहित्य-साधनांची योग्य निवड

झाडं, फळं, वनस्पती, लाकूड, दगड, पाणी, वाळू, असा सृष्टीतल्या विविध गोष्टींची रेलचेल इथं असल्यामुळं त्यांच्या सान्नीध्यात येणाऱ्या अनुभवातून मुलं खूपसं कांही सतत शिकत राहतात. वर-खाली, जलद-हळू, जड-हलका असे फरक स्पष्ट करण्यासाठी इथं झोके आहेत. घसरगुंड्या आहेत.

समाजाबरोबर तसंच आपल्या रोजाऱ्यापाजाऱ्यांशी ओळख करून हितसंबंध प्रस्थापित केल्यामुळं आपल्याला पाहिजे असलेल्या गोष्टी ठरवणं सोपं होत. माल भरण्याच्या पेट्या तसंच जुनी खोकी झाडावर तयार करण्याच्या घरांसाठी, केबल्सची रिकामी रिळ कसरतीचे खेळ खेळणाऱ्यांसाठी, तुटलेले-फुटलेले सिमेंटचे पाईप्स् घसरगुंडी बनवण्यासाठी खांब आधार म्हणून, झोपाळे बनवण्यासाठी पिंप अशा अनेकविध वस्तू आजूबाजूच्या परिसरामधून मिळवता येणं शक्य आहे. टायर्स, दोर, दोरखंड,बांबू, शिड्या, सिमेंट, वाळू, विटा, दगड-गोटे, पडलेल्या झाडांचे ओंडके झाडांचे अवशेष, लाकडाचे तुकडे या आणि अशा कितीतरी वस्तू मिळाल्या तर खूप कांहीसं करता येणं शक्य आहे. आपल्या खेळासाठी





आपण कांहीतरी टाकाऊ वस्तूमधून आणि निर्माण करणं — त्यासाठी डोळे उघडे ठेवून-कान जागरूक ठेवून नवीन निर्मितीसाठी धडपडत राहणं हेही मुलांच्या दृष्टीनं अतिशय महत्वाचं आहे. मात्र हे करत असतांना सुरक्षिततेकडे कानाडाळा करता कामा नये.

अशा निरुपयोगी म्हणून फेकून दिलेल्या वस्तूमधून मुलं आपलं क्रीडाविश्व निर्माण करू शकतात. अशावस्तू एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवणं सहजशक्य होतं. रोज कांहीतरी नवीनं अनुभवायला मिळालं तर मुलांना ते नक्कीच मजेशीर वाटेल. पण या वस्तू उघड्यावर ठेवणं तेवढंच धोक्याचं ठरू शकेल. त्या वस्तू सहज चोरीला जाऊ शकतील. यासाठी त्या सुरक्षितपणे ठेवण्यासाठी गोदामांची गरज भासेल. त्यामधे सुद्धा विविध विभाग पाडणं फायद्याचं ठरेल. त्यामुळं पाहिजे तीवस्तू सहजपणे उपलब्ध होऊ शकेल.

क्रीडांगणांची सुयोग्य आखणी/रचना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहजपणे हलवता येईल अशा क्रीडा साहित्याची कल्पक तरतूद, आणि विविध खेळाचं मुलामुलींना मार्गदर्शन करून त्याच्यात खेळांविषयी आवड निर्माण करण्यात मोठी महत्वाची भूमिका बजावणारा नेता या सर्व सहजसुंदर संयोग यामुळं मुलांमध्ये खेळांविषयी आकर्षण निर्माण करण्यास योग्य असं वातावरण तयार करता येत.

सहज हाताळता येणाऱ्या वेगवेगळ्या **क्रीडा साहित्याची वर्गवारी आणि यादी अशी —**

**उपकरणं आणि पेटारे/भांडी —**

बागकामासाठी फावडी-कुदली-वाळू, पाणी, लाकूडकामासाठी करवती-हातोडे-खिळे-पाण्याचे फवारे मारण्यासाठी पाईप्स् बादल्या-भांडी, गाळणी. प्लास्टिकच्या बाटल्या असे साहित्य जसे नवे कार्यक्रम तयार होतील तसे उपयोगी पडतील.

**कला आणि हस्त व्यवसायः** कागद (विविध प्रकारचे), डिंक, रंग, कार्ड बोर्ड्स, पेट्या, खोकी, लाकूडाचे तुकडे, बाटल्यांची झाकणं, तारा, झाकण, कापडाचे तुकडे, लोकरीचे तुकडे, भेटवस्तूंची आवरणं, रिबिनी, मेणाचे खडू, बरण्या इत्यादि साधने उपयोगी पडतात.

बांधकाम, मुखवटे, बाहुल्या, कळसूत्री बाहुल्या, पशुसंवर्धन, कला तसंच हस्तव्यवसायाच्या वस्तू यासाठी कितीतरी टाकाऊ वस्तूंचा उपयोग होऊं शकतो.

या वस्तूंच्या वैविध्यातून नाही तर योग्य तरतूदीमधून तसंच मांडणीतून नवनवीन खेळाच्या प्रकारांना प्रोत्साहन देता येईल.

प्रत्यक्ष वापर करण्याच्या जागेचा नकाशा डोळ्तांसमोर ठेवून जर यावस्तूंची तरतूद केली तर ती जास्तीतजास्त उपयोगी ठरेल.

**उदाहरणार्थ—** मैदानीखेळ (ठिकऱ्या, चेकर्स वगैरे) चेंडू वापरून खेळण्यासाठी विस्तृत मोकळी जागा, दोऱ्यांचे खेळ इत्यादी.

मुलं त्यांना उपलब्ध करून दिलेल्या वस्तूंचां उपयोग वेगवेगळ्या पद्धतीने करत असतात.

तान्ह्या मुलांना तसंच नुकल्याच चालायला लागलेल्या मुलांसाठी अशा वस्तू उपलब्ध करून द्याव्यात कीत्यामुळं त्यांच्या संवेदनांना चालना मिळेल आणि कांही नवीन अनुभवता येईल. त्यांना हलक्या, सुरक्षित, गोलाकार-टोक रहित वस्तू खेळण्यासाठी देणं उचित ठरेल.


— वाळूमधे खेळताना छोटे छोटे रस्ते, घरं, मोटारी, बोगदे पूल वगैरे बनवण्यासाठी सहजपणे वाहूननेता येतील अशा बारीकसारीक वस्तू मुलांना उपलब्ध करून द्यायला हव्यात.

— याशिवाय शिडी, ब्लॅंकेट, कार्डबोर्ड बॉक्सेस, लाकडी फळ्या, दुधाच्या बाटल्या ठेवण्याचे स्टॅंड्स अशासारख्या वस्तू खेळातली जहाजं घरं बनवण्यासाठी वापरता येतात.

— पाळीवप्राणी आणि त्याची देखभाल करण यात मिळणार समाधान अवर्णनीय आहे. पण यासाठी स्वतंत्र जागा हवी सतत लक्ष ठेवायला हवं. जनावरांची काळजी वाहण्याच्या कामी जबाबदारी उचलायला अनेकांनी पुढं यायला हवं. काळजीपूर्वक देखरेख ठेवायला हवी.

**मुख्य कार्यक्रम आणि घटना**

वेगवेगळे सण साजरे करणे, नविन बांधणीचे काम हाती घेणे, एखाद्या कार्यक्रमाची योजना करणे अशा सारख्या मुलांना गोडी वाटणाऱ्या कार्यक्रमांची जबाबदारी घेण्यासाठी ही नियोजनाची, सुसुत्र आखणीची आणि सर्वानुमते तो राब



— विविध कला विष्कार, शिल्पकला, कोरीवकाम, वॉल पेन्टिंग्ज, हस्तव्यवसायाच्या आकर्षक वस्तु, छपाई अशा अनेकविध क्षेत्रात कांही तरी नवीन प्रयोग करण्यासाठी सुविधा हवी.

— आता गेम्सबद्दल बोलायचं झालं तर पटावरचे खेळ. पत्त्याचे खेळ, गोट्यांचे खेळ-फासे-सोंगट्या वापरून खेळायचे केळ असे कितीतरी बैठे खेळ उपलब्ध आहेत. या खेळांसाठी लागणाऱ्या साहित्याचा साठा करून ठेवला पाहिजे.

विण्याची आवश्यकता असते.

मुलांना उत्तमोत्तम खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहित करायचं असेल तर खेळांचं संपूर्ण ज्ञान असलेला-मार्गदर्शन करूं शकणारा असा नेता लाभायला हवा. खेळांसाठी आवश्यक ते साहित्य उपलब्ध असायला हवं. पालकांनीही यात रस घेऊन मुलांच्या खेळांमधे मिसळायला हवं. समाजात त्या प्रत्येक घटकानं मुलांच्या शारिरीक-मानसिक-बौद्धिक विकासाच्या या



कार्यात (खेळांच्या माध्यमाद्वारे) हातभार लावण्यात पुढाकार घ्यायला हवा.

नवनवीन खेळ आणि त्यासाठी लागणारं साहित्य-साधनं याच्याबाबत सतत संशोधनात्मक वृत्ती अंगीकारली गेली पाहिजे. उंच चढून जाणं (शिडीच्या साहाय्यानं पायऱ्यांवरून-दोर-दोरखंडावरून-खांबावरून) तोल सांभाळण्याचे कसरतीचे खेळ, सी-सॉ-झोपाळे-घसरगुंडी-पुढे-मागे होणारे खेळतातले घोडे-चक्राकार फिरणारे घोडे असे कितीतरी प्रकार उदाहरणादाखल देता येतील. नवीन प्रयोग आणि मुलांना निखळ आनंद कसा मिळेल याचा सतत विचार करत राहणं आवश्यक आहे.

**साहित्य-साधनांची योग्य निवड —** लाकूड, स्टील, सीमेंट, पाईप्स् आणि इतर टाकाऊ साहित्याचा वापर कसा करायचा हे बांधकामाचा खर्च, देखरेख ठेवण्याची शक्यता-साधनं-साहित्य उत्तम अवस्थेत राहतील यासाठी चोख व्यवस्था, मुलांचे वयोगट, खेळण्यासाठी उपलब्ध जागा अशा विविध महत्वाच्या बाबींवर अवलंबन राहील.

— सुरक्षिततेची व्यवस्था, वरचेवर केलेली पाहणी-देखरेख धोका टाळण्याची व्यवस्था, हवामानातल्या बदलानुसार-ऋतुमानानुसार साहित्याचं होणारं संभाव्य नुकसान या सर्वच गोष्टींकडे लक्ष ठेवायला लागेल.

टायर्स, रोपस्, पिंपे अशा सारख्या टाकाऊ वस्तू वस्तीत रहाणाऱ्या माणसांकडून उपलब्ध होऊ शकतील. त्याचप्रमाणे यागोष्टिंचा उपयोग करणे, बांधणी करणे हेसुद्धा वस्तीतील लोकं करू शकतील.

खेळाची मैदानांची चोख व्यवस्था सतत ठेवली गेली पाहिजे. यासाठी तन-मन-धन अर्पण करण्याची तयारी असायला हवी.

# प्ले-लीडर्स

मुलांना खेळ खेळण्यासाठी सुयोग्य जागा उपलब्ध करून देणारी — खेळांमधे मार्गदर्शन करणारी-मुलांना सतत मदतीसाठी हात पुढं करणारी त्यांना आधार देणारी माणसं-संधी उपलब्ध करून देणारी माणसं फारच महत्वाची ठरतात.

प्रत्येक मुलाच्या मनाची जडणघडण वेगळी असते. साहजिकच खेळांबाबत प्रत्येकाची आवडही निरनिराळाच असणार! कोणत्या मुलाला कोणता खेळ अधिक आवडेल याचा सारासार विचार करून त्याप्रमाणे साहित्य-साधनं उपलब्ध करून देणं. मार्गदर्शन करणं आणि प्रोत्साहन देत राहणं यामुळं मुलांचा सर्वांगीण विकास साधणं शक्य होतं.

उदा. बागकाम, कला, नाट्यमंच, लिखाण, वाचन, मैदानी खेळ असे वैविध्य असलेले खेळ.

मुलांच्यात खेळांविषयी आवड निर्माण करून त्यांना त्यात्या खेळात प्राविण्य मिळवता येण्यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या 'म्होरक्यांची' भूमिका फार महत्वाची ठरते. मुलांच्या मनाचा अभ्यास करून, त्यांच्या कलानं-त्यांच्याशी जवळिक साधून जेणे करून त्यांना निखळ आनंद मिळेल असा सतत प्रयत्न या 'म्होरक्यांनी' करायचा असतो.

विणकाम-हस्तकला व्यवसाय, चित्रकला-मॉडेलिंग अशा अनेकविध कलांमधे ही मुलांना प्राविण्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करता येतात. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या मनाचा थांगपत्ता शोधून काढणं आश्यक आहे.त्यासाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा अभ्यास व्हायला हवा. अनुभवाची शिदोरी जवळ हवी आणि मुख्य म्हणजे एक काम म्हणून त्याकडे न पाहता आंतरिक तळमळ आणि संपूर्ण भक्ती असायला हवी. वयानुसार-परिस्थित्यनुसार मुलांची आवड-निवड बदलू शकते याची जाण सतत ठेवायला हवी. त्यांच्या मूलभूत गरजाकाय आहेत त्या ओळखून त्या पुरवल्या जातात की नाही याकडे लक्ष ठेवायला हवं.

कॅलेन्डर डोळ्यापुढे ठेवून-हवामान-ऋतुमान यातले बदल लक्षात घेऊन शाळेचीवेळ, सुट्या मुलांची वयं त्यांचे अभ्यासक्रम, त्यांचे शेजारी, घरातलं, घराच्या आजूबाजूचं वातावरण या सर्वांचा अभ्यासकरून मग विकास योजना तयार करायला हव्यात आणि त्यांची काटेकोर अंमल बजावणी होते आहे याची खात्री बाळगायला हवी.

मुलांना खेळाचे प्रकार-साधनं निवडण्याचं पूर्ण स्वातंत्र्य द्यायला हवं. त्यांच्यावर कुठल्याही प्रकारचं दडपण आणता कामा नये. त्रासदायक देखरेख टाळायला हवी. यात शिक्षकांची जबाबदारी फार मोठी असते. अतिशय कौशल्यानं त्यांना परिस्थिती हाताळावी लागते.

**उदाहरण - उन्नत नगर विद्यालय - गोरेगांवः**

आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत (पर्यावरण्यात) बदल घडत गेले की त्याचा परिणाम म्हणून सामाजिक बदल ही अपरिहार्य बनतात.

शाळेच्या मागच्या बाजूला काय परिस्थिती होती? काचांचा खच-शिळपाकं फेकलेलः अन्न, घाण-केंरकचरा टाकाऊ वस्तूंचा भरमसाट इतस्ततः पसरलेला पसारा रानटी झाड-झुडप खाजकुचलीची भयंकर झाडं अशा परिस्थितीत, याजागी शालकरी मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल-त्यांच्या लाईफस्टाईलमधे आवश्यक तो बदल घडेल या उदात्त हेतून, याचं रूपांतर सध्या तिथं अस्तित्वात असलेल्या स्वच्छ मैदानात होईल. तिथं मुलांना निखळ आनंद देणारे विविध खेळ खेळता येतील रंग-सुगंध-सौंदर्यानं नटलेल्या पाना-फुलांच्या झाडांच्या सान्निध्यात-निसर्गाच्या जणूं कुशीत शिरून लहानग्यांना यथेच्छ आनंद लुटता येईल. हा विचार इतक्या लवकर प्रत्यक्षात अवतरेल याची कुणालाच आशा-खात्री नव्हती. पण अशक्याला शक्य करून दाखवल-इथल्या शिक्षकांनी-विद्यार्थ्यांनी उच्चाटन झालं आणि साक्षात स्वर्ग निर्माण झाला. योजनांची आखणी-त्यांची अंमलबजावणी अफाट परिश्रम आणि मुलांच्या कल्याणासाठी आवश्यक ती धडपड-तळमळ यांचा परिपाक म्हणजेच आजची ही परिस्थिती

इथं नैसर्गिक वातावरणात मुलं आनंदात उड्या मारतात, बागडतात-झाडावर चढतात-झोके घेतात-बागकामाचा आनंद लुटतात - वनस्पतींचा अभ्यासकरतात - कविता करतात - नियतकालिक तयार करतात - नवनवीन गेम्स शिकतात-आत्मसात करतात. हस्तकलेची प्रात्याक्षिक करतात-कलागुणांना इथं पूर्ण वावसंधी दिली जाते. कळसूत्री बाहुल्यांचे खेळ-नाट्य-संगीत-सगळीच मौजमजा! 'गणेश' मूर्ती बनवण्याचा कामातही इथल्या विद्यार्थ्यांनी हातभार लावल्याची नोंद आहे. थोडक्यात काय तर इथं आदर्श म्हणून आणि व्यवहार्य म्हणून जेजे अस्तित्वात आहे त्या सर्व गोष्टींचा पाठपुरावा केला जात आहे. मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी श्रीयुत दंडवते यांनी तसंच इतर असंख्य मान्यवरांनी आणि जन सामान्यांनी या परिसराचा उत्साह-आनंद द्विगुणित करण्यासाठी शक्य तितकी मदत आपणहून केली आहे

छोटीशी सुरूवात फार महत्वाची असते. हळूहळू त्यातून प्रगती साधता येते आणि मग एकदिवस 'इतिहास' घडू शकतो मुलांच्या अंगच्या गुणांना पूर्ण वाव दिला तर ही मुलं विश्वास बसणार नाहीं अशा कितीतरी उत्तमोत्तम गोष्टीं करूं शकतात. क्रीडा-कला साहित्य आणखी कितीतरी क्षेत्रात! त्याला बंधन राहत नाहीत. फक्त त्यांना सरूवात करून द्यावी लागते. उत्तममार्गदर्शन करावं लागतं. चांगलं काय आणि वाईट काय याची लहान वयातच पारख करायला शिकवतात इथले आदर्श शिक्षक. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद म्हणजे या परिसरात मुलांच्या कल्याणासाठी चाललेल्या भगीरथ प्रयत्नांची पावतीच आहे. प्रशिक्षणाचे नवनवीन कार्यक्रम आखले जात आहेत. सामाजिक



कार्यकर्ते ही आपणहून पुढे येत आहेत. प्रशिक्षण घेत आहेत.

अनाथालय-बालगुन्हेगारांची पुनर्वसन केंद्र, मुलांना मार्गदर्शन करणारी चिकित्सालयं या आणि अशा कितीतरी मार्गानी मुलांच्या कल्याणासाठी विविध उपाययोजना कार्यान्वित केल्या जात आहेत. स्वच्छ परिसराच्या निर्माणाची आवश्यकता, जागेचा अपव्यय टाळणं आणि पुरेपूर आणि यथायोग्य उपयोग करून घेणं तसंच निर्सगाच्या सान्निध्याचा आनंद उपभोगणं, या सगळ्या गोष्टी इथं घडतात.